२८९१४

महाराष्ट्र शासन
स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई
☎/ 🖷:- ०२२ २७५७१३९१ Website:www.mahalfa.in E.Mail:ad.report@mahalfa.in

क्र.स्था-१८ /ब/ प्रारंभिक बैठक / अंतिम बैठक / वलेप अहवाल / ५६३ दिनांक :- 27 MAY 2014

प्रति

१. सह संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
----सर्व--------

२. सहाय्यक संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
-----सर्व---------

विषय:- लेखापरीक्षणास सुरूवात करण्यापूर्वी संबंधित संस्थेबरोबर प्रारंभिक बैठक (Entry Conference) व लेखापरीक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रारुप लेखापरीक्षण अहवाल अंतिम करतांना निर्गमन बैठक (Exit Conference) घेणेबाबत.

संदर्भ:- मा.प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे अध्यक्षतेखाली बांधकाम भवन मुंबई येथे झालेली दिनांक २९/४/२०१४ रोजीची मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची बैठक.

दिनांक २९/४/२०१४ रोजी बांधकाम भवन मुंबई येथे मा.प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे अध्यक्षतेखाली मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची बैठक पार पडली. सदर बैठकीस मा.संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा विभाग यांना निमंत्रित करण्यात आले होते. लेखापरीक्षणासंबंधी चर्चा करतांना मा.प्रधान सचिव यांनी अशी सूचना केली की, लेखापरीक्षणास प्रारंभ करण्यापूर्वी आणि लेखापरीक्षणाच्या प्रारुप लेखापरीक्षण अहवालाचे अंतिमीकरण करण्यापूर्वी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संबंधित विभागाचे विभाग प्रमुख यांचे सोबत बैठक घेण्यात यावी.

त्यानुसार लेखापरीक्षणास सुरूवात करण्यापूर्वी विभागीय सह संचालक व जिल्हा सहाय्यक संचालक यांना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संबंधित विभागाचे प्रमुख यांचे सोबत प्रारंभिक बैठक (Entry Conference) घ्यावी. सदर बैठकीत खालील बाबींवर चर्चा करून माहिती द्यावी :-

१. लेखापरीक्षणास केव्हा सुरूवात होणार आहे याची माहिती महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० च्या कलम ६ पोट कलम (३) नुसार प्रारंभिक बैठक (Entry Conference) होण्यापूर्वी कळविणे आवश्यक आहे. त्यानुसार ती कळविली जाईल.

२. लेखापरीक्षणासाठी विहित केलेल्या श्रमदिनांची माहिती देणे.

३. लेखापरीक्षणासाठी आवश्यक असलेल्या अभिलेख्यांची माहिती देऊन चर्चा करणे.

४. काही वेळा लेखापरीक्षणासाठी अभिलेख उपलब्ध करून दिले जात नाहीत. अशा बाबी सदर चर्चेच्या वेळी निदर्शनास आणणे.

लेखापरीक्षण पूर्ण झाल्यानंतर आणि त्यासंबंधीचा प्रारुप लेखापरीक्षण अहवाल तयार केल्यानंतर जिल्हा परिषदेच्या उपरोक्त अधिका-यांशी निर्गमन बैठक (Exit Conference) घेण्यात यावी. सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे कार्यवाही केली जाईल:-

१) प्रारुप लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेदासंबंधी उपरोक्त अधिका-यांशी चर्चा करणे.

२) अहवालातील परिच्छेदांच्या अनुपालनासंबंधी चर्चा करतांना काही स्पष्टीकरण, कागदपत्रे दर्शविल्यास ती विचारात घेणे.

३) चर्चेअंती अहवालाच्या अंतिमीकरणाची कार्यवाही करणे.

अशाच प्रकारची कार्यवाही खालील संस्थांचे लेखापरीक्षण करतांना करण्यात यावी.

१) अ वर्ग नगरपरिषदा

२) कृषि विद्यापीठे

३) महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूर

४) महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळ मुंबई

५) सभापती मुंबई महानगरप्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती कळंबोली

६) जिजाबाई टेकनॉलॉजिकल इन्स्टिटयूट माटुंगा

७) छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबई

८) महाप्रशासक वैयक्तीक खातेवही (A.G.)

९) शासकीय विश्वस्त (O.T.)

१०) महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ नायगांव

लेखापरीक्षणाचे काम गुणवत्तापूर्ण, चांगले आणि पारदर्शक होण्यासाठी वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(का.मा.विधाते)
संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य

-३-